GRT
Golden Research Thoughts
ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

ऐतिहासिक लातूर परिसर - एक शोध

डॉ. एन. बी. सुर्यवंशी
इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,शिवनेरी महाविद्यालय,शिरूर अनंतपाळ जि. लातूर (महाराष्ट्र)

प्रस्तावना

आजचे लातूर ऐतिहासिक व प्राचीन नगर असुन त्याचा उल्लेख शिरूर शिलालेखात इ. स. ८१२-१३, लिनगुंद शिलालेखात इ. स. ८६६, मंटूर शिलालेखात इ. स. १०४०, सिताबर्डी (नागपूर) शिलालेख इ. स. १०८७, दरेदळ शिलालेख इ. स. ११२३, लातूर शिलालेख (पापनाश मंदीर) इ. स. ११२८ सौंदती शिलालेख इ. स. ११८८, कल्हाळे ताम्रपट इ. स. १२०४, भोजताम्रपट इ. स. १२०८, कान्हेगाव शिलालेख (लातूर जिल्हा) इ. स. १२५८, कल्पसमूह ग्रंथ इ. स. १३५० - १८०० व रत्नापूर महात्म्यात (लातूर पोथी) वरील प्राचीन संदर्भावरून मिळतो.[१] लत्तलूर, लत्तलौर, लत्तनूर, लत्तलूर, लत्तनूर, लत्तनौर, लत्तनुर व लत्तलूर असा उल्लेख वरील संदर्भ साधनांमधून आढळून येतो.

भूगर्भातील हालचालीमुळे व ज्वालामुखीमुळे भूपृष्टावर अनेक नैसर्गिक रूपे निर्माण झाली. पर्वत, पठार, डोंगर, दऱ्या-खोऱ्या, नदी-नाले, टेकड्या ही त्याची बोलकी उदाहरणे म्हणून देता येतील. नैसर्गिक हालचालीमुळे भूभागाला उतार प्राप्त झाला. त्यातूनच पुढे नद्यांचा उदय घडून आला. पाणी म्हणजे

जीवन या न्यायाने नदी किनारीच पशुपक्षी, जीवजंतू व मानव वस्ती करून राहू लागला. या नद्यांच्या कुशीतच किंवा काठांनी मानवी वस्त्यांचा उदय झाला. गेल्या ३० वर्षात केल्या गेलेल्या संशोधनात महाराष्ट्रातील गोदावरी, मांजरा, कृष्णा, तापी, घोड इत्यादी नद्यांच्या खोऱ्यात आद्यपुराश्मयुकालीन अनेक स्थळे उजेडात आली आहेत.[२] गोदावरी, मांजरा या नद्याच्या खोऱ्यात बैल, म्हैस, हत्ती, घोडा, पानघोडा, गेंडा, हरणे इ. प्राण्यांच्या आस्मास्ती उत्खणनात मिळालेल्या आहेत.[३] आजच्या लातूर जिल्ह्यातून वाहत असलेल्या मांजरा नदीच्या किनारी आद्यपूराश्मयुग कालापासूनच वस्त्या व्हावयास सुरूवात झाली असावी. त्याचा लिखित पुरावा जरी मिळत नसला तरी या नदीच्या परिसरात मिळालेल्या प्राण्यांच्या सांगाड्यावरून हे स्पष्ट होते. मांजरा नदीच्या खोऱ्यात पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयाचे पुराजीवशास्त्रज्ञ डॉ. विजय साठे यांनी नदीपात्रात लातूर जवळ उत्खणन केले. या उत्खननात मांजरा नदीमध्ये ५० हजार वर्षापूर्वीच्या हत्ती, पानघोडा, गेंडा, रानम्हशीचे जिवाश्म अवशेष शोधले आहेत. त्या अवशेषावरून लातूर जवळ मांजरा नदीच्या पात्रात अश्मयुगीन मानवाच्या समकालीन प्राण्यांची वस्तिस्थाने असावीत असा अंदाज संशोधक डॉ. विजय साठे यांनी व्यक्त केलेला आहे.[४] लातूर जिल्ह्याच्या परिसरातून मांजरा नदी व तीच्या उपनद्या रेणा, तावरजा, घरणी, तेरणा, देवणी इ. व उदगीर तालुक्यातून लेंडी, जळकोट तालुक्यातून तिरू नदी व चाकूर, अहमदपूर परिसरातून मन्याड नदी वाहते. या नद्यांच्या काठावरच आदिमानवाने वस्त्या केल्या असाव्यात असे म्हणता येईल. नद्यांच्या परिसरातील घनदाट जंगल अस्तित्त्वात असावे. जमीन सुपीक असावी आदिमानव याच परिसरात अन्न व पाण्याची गरज पूर्ण होत असल्यामुळे वास्तव्य करून राहात असावा. बीड जिल्ह्यातील बीड, माजलगाव, गेवराई तालुक्यातही उत्तर अश्मयुगातील हत्यारे सापडली आहेत. याचा अर्थ असा की, मराठवाड्यात अश्मयुगात मानवी वसाहती अस्तित्त्वात होत्या. नवाश्मयुगात मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले तो शेती व पशुपालन करू लागला. राहण्यासाठी त्याने झोपडी वजा घरे उभारली. मात्र याचा पुरावा मराठवाड्यातच नव्हे तर महाराष्ट्रातही आढळून आलेला नाही. प्रागैतिहासिक मानवाच्या वास्तव्याच्या अनेक खुणा गोदा खोऱ्यात व मांजरा खोऱ्यात आढळून आलेल्या आहेत.[५] नाशिकालगत गोदावरीच्या उजव्या काठावर अश्मयुगीन मानवाची वस्ती असल्याचे पुरावे आढळून आले आहेत. वरचेवर मानवाची भौतिक प्रगती होत राहीली. उत्तर भारतात सिंधू संस्कृतीच्या रूपाने मानव विकसित झाला. पुढे सिंधू संस्कृती उतरणीला लागल्यावर

येथील मानवाने तापी नदी खोऱ्यात वस्ती केली. पुढे तो मानव गोदावरी नदीच्या खोऱ्यापर्यंत आला असणार तेथून त्याच्या उपनद्या मांजरा पर्यंत हा मानव आपली वस्ती स्थापन करून राहत होता असे म्हणण्यास वाव मिळतो. यावरून लातूर जिल्ह्याच्या प्राचीन इतिहास उत्तर सिंधू कालखंडापासून सुरू होतो. असे मानन्यास वाव आहे. गोदावरी नदी परीसरात बौध्द कालखंडात पुलिंद, शबर, आंध्र इ. टोळ्यांचे तांडे स्थिरावले. एवढेच नव्हे याच परिसरात पैठणच्या रूपाने एक नगर उदयाला येऊन नागरीकरणास सुरूवात झाल्याचे दिसते. उत्तर भारतात स्थापन झालेल्या मौर्य घराण्याच्या साम्राज्यापासून भारताच्या प्राचीन इतिहासास सुरूवात होते. दक्षिण भारतातील महाराट्र, आंध्र, कर्नाटक या राज्यात मौर्य सम्राट अशोकाचे कोरीव लेख आढळून आलेले आहेत. परिणामी हा भागही मौर्य सम्राटाच्या सत्तेखाली होता. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असलेल्या बौध्दवास्तूवरून आपणास महाराष्ट्रावर मौर्यांची सत्ता होती असे म्हणता येईल. मात्र लातूर जिल्ह्यात बौध्द धर्माचे अवशेष आढळून आलेले नाही. तरी परंतु नंद घराण्याच्या सत्तेपासून हा प्रदेश उत्तरेतील राज्यसत्तेच्या खाली असावा.

आजचे नांदेड म्हणजेच प्राचीन काळचे 'नवनंदडेरा' असे काही विद्वानांचे मत आहे.[६] हीच नवनंदडेरा नंद सम्राट धनानंदाची उपराजधानी होती. यावरूनच उत्तरेतील नंद व मौर्य या सत्तांचा मराठवाड्याशी संबंध आल्याचे स्पष्ट होते. नांदेड, प्रतिष्ठाण या नगराशीही नंदाचा संबंध सांगणाऱ्या अनेक कथा या परिसरात ऐकावयास मिळतात. मौर्य काळात भरभराटीला आलेल्या तेर व सन्नती या नगरांना जोडणारा राजमार्ग लातूर जिल्ह्यातून जात होता. यावरून लातूरचा समावेश मौर्य प्रशासित प्रदेशात होत असावा असे दिसते.[७] सातवाहनांनी दक्षिण भारतात पहिले साम्राज्य स्थापिले व अश्मक, कूंतल, मूलक या जनपदाच्या अधिकाराखाली विभागलेले प्रदेश सातवाहनांनी संघटीत केले.[८] मौर्य साम्राज्याचा ऱ्हास होऊन सत्ता शुंगाकडे व त्यानंतर कण्वांकडे हस्तांतरीत झाली. त्यानंतरच सातवाहन घराण्यांचा उदय झाला.[९] सातवाहन सम्राट पैठणचे त्यांनी इ. स. पूर्व २३० ते इ. स. २३० असे एकंदरीत ४६० वर्षे राज्य केले. सातवाहन या महापुरूषाने सातवाहन घराण्याची स्थापना केली. त्याच्या नावावरूनच या घराण्यास सातवाहन हे नाव प्राप्त झाले. सातवाहन राजसत्ता ही गोदा खोऱ्यातील पहिली स्थिर राजसत्ता होय. या राजसत्तेने जवळजवळ पुर्ण दक्षिण भारतावर राज्य केल्याच पूरावे उपलब्ध झाले आहेत.[१०] लातूर परिसराचा पूर्वीचा जिल्हा उस्मानाबाद (धाराशिव) या नगरापासून १८ किमी अंतरावर तेरणा नदीच्या दक्षिण काठावर तगर (तेर) हे प्राचीन नगर वसलेले आहे. तेथे मो. ग. दीक्षितांनी महाराष्ट्र शासनातर्फे १९६७-६८ साली तेथील महार टेकडीवर व जवळपासच्या भागात उत्खणन केले आहे. तेथे सातवाहन कालीन वस्ती आढळून आली. नाणी देखील आढळली आहेत. यावरून या परिसरात सातवाहनांची सत्ता होती असे म्हणता येते. तेरचा प्राचीन लिखानातील उल्लेख 'पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रियन सी' या ग्रीक खलाशाने लिहिलेल्या ग्रंथात मिळतो. या ग्रंथाचा काळ इ. स. ४० ते १०३ आहे. हा अनामिक लेखक या ग्रंथातील ५१ व्या प्रकरणात दक्षिणेतील महत्त्वाच्या व्यापारी केंद्राबद्दल माहिती देतो. त्यामध्ये त्या काळचे तगर (तेर) हे नगर व्यापाराचे मोठे केंद्र असल्याचा उल्लेख त्याच्या लिखानात येतो. नागनीकाच्या नाणेघाट विस्तृत लेखात सिमुक याला 'दक्षिणापतपती' ही पदवी दिलेली आहे. यावरून सातवाहन राजांनी दक्षिणेवर राज्य केल्याचे ज्ञात होते. मराठवाड्याचा इतिहास आणि संस्कृती सातवाहन काळात अधिक स्पष्टपणे समोर येते. सातवाहनांनी द. भारतात पहिले साम्राज्य स्थापिले आणि आजचा मराठवाडा म्हणून प्रसिध्दिस आलेला प्रदेश भारताच्या मानचित्रावर झळकू लागला. या आधी हा प्रदेश अश्मक कुतल, मुलक या जनपदात विखुरलेला होता. सातवाहनांनी या प्रदेशाला संघटीत केले. दक्षिण भारतात या पहिल्या साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवणारे हे सातवाहन मराठवाड्याचेच होते. सातवाहनांचा अंमल मध्यप्रदेशाचा दक्षिण भाग, गुजरातचा पूर्व भाग, महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक एवढ्या अवाढव्य प्रदेशावर होता.[११] राजा हल याने लिहीलेल्या 'गाथा सत्तसई' या ग्रंथातून सातवाहनाविषयी व त्या काळातील परिस्थितीविषयी बरीच माहिती मिळते. प्लीनी, टॉलेमी, पेरीपल्स या प्रवाशाकडून बरीच माहिती मिळते. टॉलेमीने सातवाहनांच्या साम्राज्यात तटबंदी युक्त ३० शहरे होती अशी नोंद केलेली आहे. त्यापैकी लातूर लगत असलेले हे तगर (तेर) हे नगर होय. लातूर येथे खोदकाम चालू असताना सातवाहन कालीन पाटा वरवंटा मिळाला तसेच औसा तालुक्यातील नागरसोगा येथे सातवाहन कालीन अवशेष आढळले.[१२] यावरून लातूर जिल्ह्यावर सातवाहनांचे वर्चस्व होते. या पुष्टी मिळते.

मराठवाड्यात सातवाहानांनतर वाकाटक, राष्ट्रकुट, चालुक्य, कलचूरी, यादव इत्यादी प्रख्यात राजघराणे होऊन गेले. सातवाहनांच्या ऱ्हासानंतर विदर्भात वाकाटकीची शक्ती वाढली. वाकाटकांची सत्ता उत्तरेकडे नर्मदा नदीपासून ते दक्षिणेत तुंगभद्रा नदीपर्यंत आणि अरबीसमुद्रापासून ते बंगालच्या उपसागरापर्यंत पसरली होती.[१३] वाकाटकांच्या काळात अनेक देवालये बांधली गेली. अजिंठा येथील १६ व १७ आणि १९ क्रमांकाची लेणी वाकाटांकच्या काळातच कोरलेली आहे. वरील विवेचनावरून आपणास असे म्हणता येईल की, लातूर जिल्ह्याच्या परिसरवर वाकाटकांचे अधिपत्य होते.

इ. स. ५५० च्या आसपास वाकाटकांच्या साम्राज्याच्या अस्त झाला. कर्नाटकातील कदंब, उत्तर महाराष्ट्रातील कलचूरी व विदर्भातील नल या राजांनी वाकाटक साम्राज्यावरती एका एका भागावर आपले वर्चस्व निर्माण केले. त्यानंतर इ. स. च्या ६ व्या शतकात बदामीच्या चालुक्याचे दक्षिणेत बलाढ्य राज्य निर्माण झाले. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील कासारशिरसी येथे बदामीच्या चालुक्याचा ताम्रपट मिळालेला आहे. या भागाची बरीच माहिती या ताम्रपटात मिळते. तसेच नांदेड येथील बोरगाव दानपत्रात औशाचा उल्लेख आलेला आहे. हे दानपत्र बदामी चालुक्य राजा विजयादित्य याच्या काळातील असून त्यात उमरगा व औसा येथील ब्राम्हणांना खेडी दान दिल्याचा उल्लेख आहे. तसेच लातूर पासून जवळच खरोसा लेण्यामध्ये चालुक्य काळातील अवशेष सापडतात. इ. स. च्या सातव्या - आठव्या शतकात हा परिसर बदामीच्या चालुक्याच्या अमलाखाली होता. त्यामुळे या राजवंशाच्या अनेक दानपत्रात या विभागातील स्थलांची आणि व्यक्तिंची नोंद आढळते.[१४] वरील साधनांवरून लातूर जिल्ह्यातील परिसरावर बदामीच्या चालुक्याची सत्ता होती, हे स्पष्ट होते.

निष्कर्ष :-

१.लत्तलौर, लत्तनूर, लत्तलूर असा अपभ्रंश होऊन शेवटी लातूर हे नाम निजाम काळात लातूरला प्राप्त झाल्याचे दिसते.
२.अश्मयुगात या परिसरात मानवी वस्ती होती. ती गोदावरी व मांजरा नद्यांच्या खोऱ्यात असल्याचा पुराव प्राप्त होतो.
३.सिंधु संस्कृतीच्या अस्ताबरोबर दक्षिण भारतात नागरीकरणाला सुरूवात झाली.
४.गोदा खोरे व मांजरा खोरे नंद व मौर्यांच्या सत्तेखाली असल्याचे पुरावे मिळतात.
५.महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असलेल्या बौध्द वास्तूवरून आपणास महाराष्ट्रावर मौर्यांची सत्ता होती असे म्हणता येईल मात्र लातूर जिल्ह्यात बौध्द धर्मासंदर्भात अवशेष आढळून येत नाहीत.
६.इ.स.पुर्व २३० ते इ.स.२३० या अवधीत दक्षिण भारतात सातवाहनांनी आपली सत्ता संघटीत केली व या भागावर त्यांनी आपले राज्य प्रस्थापित केले.
७.त्याकाळचे तगर म्हणजेच आजचे तेर हे नगर व पैठण व्यापाराचे मोठे केंद्र असल्याचे अनेक पुराव्यांवरुन सिद्ध होते.
८.लातूर जिल्ह्यातील अनेक ठिकाणी सातवाहन कालीन अवशेष आढळून आले आहेत.
९.सातवहानानंतर या भागात अनेक राजवंश होऊन गेले. बदामी चालुक्याच्या संदर्भाने या भागात अनेक संदर्भ मिळतात.
१०.एकंदरीत लातूर परिसराला प्राचीन इतिहास असून लातूर हे नगर ऐतिहासिक असल्याचे अनेक तत्कालीन व ऐतिहासिक पुराव्यावरुन मान्य करावे लागते.

संदर्भ :-

१.जोशी सु.ग. (संपा.) २००८ लातूरचा इतिहास आणि रत्नापूर महात्म्य, मराठवाडा संशोधन मंडळ, लातूर.
२.सांकलिया एच.डी., १९७४ प्रिहिस्ट्री ॲण्ड प्रोहिस्ट्री ऑफ इंडिया ॲण्ड पाकिस्तान , डेक्कन कॉलेज, पुणे पृ.क्र.४७-८९
३.महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, २००२, महाराष्ट्र शासन, मुंबई., खंड-पहिला, पृष्ठ ३७.
४.दैनिक सकाळ, मधील बातमी, २४ फेब्रुवारी २००६.
५.धारुरकर वि.ल.,२००६ , गोदाकाठची ताम्रपाशानयुगीन संस्कृती, गोदाखोरे : इतिहास आणि संस्कृती, औरंगाबाद पृ १९.
६.राजन अमिताभ (कलेक्टर) डॉ. देव प्रभाकर (संपा.)१९८६ स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध, नांदेड.
७.महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, लातूर जिल्हा, भाग -१ २००८, दर्शनिका विभाग, मुंबई, पृ.-५७.
८.देगलुरकर गो.ब., २००४ भारुड, स्मरणीकेच्या अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळ, ७७ वे मराठी साहित्य संमेलन, औरंगाबाद, पृ - २६.
९.डहाके वंसत आबाजी, २००६ मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई पृ.-१२.
१०.डॉ. सावंत उत्तम, २००४ भारतीय पुरातत्त्व शास्त्र (तत्व आणि पध्दती) निर्मल प्रकाशन, नांदेड. पृ-१७१.
११.डॉ. सोमनाथ रोडे (संपा.) निवडक शोध निबंध,खंड - दुसरा, मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद पृ-२४.
१२.उस्मानाबाद जिल्हा गॅझेटीअर, १९७२, महाराष्ट्र शासन , पृ- ३२.
१३.कोलते व्ही.बी., १९८७, महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख व मुंबई पृ-१०४.
१४.जोशी सु.ग. (संपा.) डॉ. देवीसिंग चौहान गौरव ग्रंथ, लातूर पृ-१४६.

डॉ. एन. बी. सुर्यवंशी
इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,शिवनेरी महाविद्यालय,शिरूर अनंतपाळ जि. लातूर (महाराष्ट्र)